म. ग्रं. सं. ठाणें
विषय ग्रु-प्रवास
सं. क्र. ३१
१९२८

REFBK-0003794

# ग्वाल्हेर येथील व आसपासच्या ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थलांचे संक्षिप्त वर्णन.

लेखक

मोरेश्वर बळवंत गर्दे, बी. ए.,

प्रकाशक

" श्री माधव मराठी वाङ्मय मंडळ "

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. ३१

ग्वाल्हेर

आलीजाह दरबार प्रेस, लष्कर मध्यें मुद्रित.

१९२८

# ग्वाल्हेर येथील व आसपासच्या ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थलांचे संक्षिप्त वर्णन.

लेखक

मोरेश्वर बळवंत गर्दे, बी. ए.,

प्रकाशक

" श्री माधव मराठी वाङ्मय मंडळ "

REFBK-0003794

ग्वाल्हेर

आलीजाह दरबार प्रेस, लष्कर मध्ये मुद्रित

३५८०
दा. क्र.
१९२८

# प्रास्ताविक शब्द.

ग्वाल्हेर येथें भरणाऱ्या अखिल भारतीय तेराव्या मराठी साहित्य संमेलनासाठीं फार दूर दूरच्या ठिकाणाहून येणाऱ्या आमच्या अनेक मराठी भाषाभिमानी बंधु भगिनीं साठीं अति प्राचीन इतिहासप्रसिद्ध व स्फूर्तिकारक अशा ग्वाल्हेर किल्ल्याचे व ग्वाल्हेरच्या भोंवतालीं असलेल्या इतर अनेक ऐतिहासिक स्थलांच्या माहितीचे हें लहानसें पुस्तक आमच्या ग्वाल्हेर राज्यांतील पुराणवस्तु संशोधक श्रीयुत मो. ब. गर्दे यानीं कृपाकरून लिहून काढलेलें आम्हीं मुद्दाम प्रसिद्ध करीत आहो. तरी याचा योग्य तो उपयोग आमचे प्रेमळ पाहुणे अवश्य करून घेतील अशी आम्हांस बळकट आशा आहे.

चंद्रोजी संभाजीराव आंग्रे,
अध्यक्ष कार्यकारी मंडळ,
व
उपाध्यक्ष स्वागत मंडळ,
अखिल भारतीय मराठी साहित्य
संमेलन ग्वाल्हेर.

ता: ३-४-२८

# ग्वाल्हेर येथील व आसपासच्या ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थलांचे संक्षिप्त वर्णन.

येत्या ईस्टरच्या सुटींत ग्वाल्हेरांत तेरावें मराठी साहित्य सम्मेलन होणार असण्याचें वृत्तपत्रांच्या वाचकांस आतां माहीत होऊन चुकलेंच आहे व बरीच महाराष्ट्र साहित्योत्कर्षेच्छु व विद्वान मंडळी संमेलनांत भाग घेण्यासाठीं खास महाराष्ट्रांतून व बृहन्महाराष्ट्रांतून ग्वाल्हेरला येतील. तेव्हां संमेलनाकरितां ग्वाल्हेरला जातांना व तेथून आपल्या गांवीं परत येतांना वाटेंत, तसेंच संमेलनाचें काम ग्वाल्हेर मुक्कामीं करीत असतांना मध्यंतरीं फुरसतीचे वेळीं सहज पाहतां येतील तीं प्रेक्षणीय स्थलें व वस्तु पाहण्याची इच्छाही "एक पंथ दो काज" या दृष्टीनें पुष्कळांस होईल. त्यांचे उपयोगासाठीं या संबंधानें संक्षित माहिती या छोट्याशा लेखांत देत आहों. सोयीसाठीं या माहितीचे तीन भाग केले आहेत: १ ग्वाल्हेरच्या रस्त्यावरील व आसपासचीं स्थळें, २ ग्वाल्हेर येथील प्राचीन स्थळें व ३ ग्वाल्हेर येथील अर्वाचीन स्थळें. या अनुक्रमेंच माहिती या लेखांत दिली आहे.

# ग्वाल्हेरच्या आसपास चीं प्रेक्षणीय स्थळें.

महाराष्ट्रांतून, व बृहन्महाराष्ट्राच्या दोन मुख्य शाखा ज्या मध्यप्रांत-वऱ्हाड व माळवा, त्यांजकडून ग्वाल्हेरास येण्याचे लोह मार्ग ( Railways ) भोपाळ येथें संगम पावतात. म्हणून व ही एक सोईची प्रदेशमर्यादा आहे म्हणून येथूनच आरंभ करूं. भोपाळ हें जी. आय. पी. रेलवे च्या मुंबई-दिल्ली या मेन लाइनवरील एक मोठें जंक्शन स्टेशन आहे. इंदुर, उज्जनी कडून येणारा फाटा येथेंच मुख्य लाइनीला मिळतो.

भोपाळ हें एका मोठ्या मुसलमानी संस्थानचें राजधानीचें शहर असून वस्ती बहुतेक मुसलमांनाची आहे. तेथें एक विस्तीर्ण तलाव प्रेक्षणीय आहे. तो राजा भोजानें बांधला म्हणतात. यावरूनच भोज-पाल ( पाल म्हणजे तळयाचा बांध ) भोपाळ हें नांव सिद्ध झालें आहे.

बौद्ध धर्माचे सांची येथील प्रसिद्ध अवशेष भोपाळपासून सुमारें ३० मैलांवर आहेत. सांची भोपाळकडून ग्वाल्हेरला जातांना चवथें स्टेशन. मेल व एक्सप्रेस गाड्या सामान्यतः येथें थांबत नाहींत. परंतु भोपाळ अथवा बीना येथील स्टेशन मास्तरला सूचना

दिल्यास पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गाच्या उतारूंसाठीं या गाड्या येथें थांबविल्या जातात.

सांची येथील अवशेष स्टेशनापासून सुमारें पाव मैलाचे अंतरावर एका टेकडीवर आहेत. यांतील सर्वांत प्राचीन अशोककालीन म्हणजे इ. स. पूर्वी ३ शतकांतील व सर्वांत अलीकडील इ. स. च्या ११ व्या शतकांतील आहेत. अर्थात हे अवशेष पाहिले असतां सुमारें १२००-१३०० वर्षांतील भारतवर्षाचा चित्रपट अंशत: तरी दृग्गोचर होतो. इतक्या जुन्या व इतक्या चांगल्या स्थितींत राहिलेल्या बौद्ध धर्माच्या इमारती हिंदुस्थानांत इतरत्र कोठेंही नाहींत. ब्रम्हदेश, चीन, जापान, इत्यादि पौर्वात्य देशांतून व यूरोप, अमेरिका इत्यादि पाश्चिमेकडील दूरदूरचे शेकडों लोक कांहीं धार्मिक जिज्ञासेनें तर कांहीं कला विषयक अथवा इतिहास विषयक जिज्ञासेनें हें स्थळ पाहण्यासाठीं दरवर्षी येत असतात. सुमारें १५ वर्षांपूर्वी हें ठिकाण अगदीं अरण्यवेष्टित उपेक्षित स्थितींत होतें. तेथील झाडी तोडून, जरूर तेथें इमारतीचे अवशेष जमीनींतून उकरून काढून, ते दुरुस्त करून व एकंदर जागेची पूर्ण सफाई करून, अलीकडे एखाद्या उपवना प्रमाणें हें स्थान स्वच्छ, व्यवस्थित व रमणीय केलें गेलें आहे.

जमिनींत मिळालेल्या सर्व मुख्या प्राचीन वस्तूंचें एक पुराणवस्तु संग्रहालयही तेथें केलें गेलें आहे.

येथील मुख्य इमारती म्हटल्या म्हणजे तीन बौद्धस्तूप अथवा स्मारकमंदिरें. तीन चार देवालयें व व कित्येक विहारांचे किंवा भिक्षूकांच्या मठांचे अवशेष ह्या होत. स्तूप नंबर १ सर्वांत मोठा आहे. त्यांतील मूळ भाग स्वत: अशोक साम्राटानें बांधिला. मुख्य इमारत घुमटाकार असून तिचे भोंवती दगडी कंपाउंड आहे. चार दिशांना चार तोरण दरवाजे आहेत. यावर जें खोदकाम आहे तें फारच दर्शनीय व ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचें आहे त्यांत भगवान् बुद्धाच्या चरित्रांतील व त्याच्या अनेक पूर्व जन्मांतील कथानकें ( जातक कथा ) मूर्त स्वरूपांत दाखविल्या आहेत. त्यावरून दोन हजार वर्षां पूर्वीचीं घरें, शहरें, मनुष्यें, पोशाख, दागदागिने, रीतिरिवाज वगैरे कसे होते तें पहावयास मिळतें. वृक्ष, फळें, फुलें, वन्यपशु वगैरेचीं चित्रेंही प्रेक्षणीय आहेत. तेथें अशोकाचा एक शिलामय स्तंभ भग्नावस्थेंत उभा आहे. दुसरे स्तूप याहून लहान आहेत. मोठ्या स्तूपाच्या पिछाडीला एका मोठ्या चैत्य मंदिराचे खांब मात्र उभे आहेत. तें मंदिर आंतून कांहींसें कार्ल्याच्या मुख्य लेण्याप्रमाणें होतें. त्याचे जवळच

चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या वेळचें एक लहान देवालय आहे; त्यावर शिखर वगैरे कांहीं नाहीं. यावेळीं मंदिरावर शिखरें बांधीत नसत. स्तूप नंबर ३ स्तूप नंबर १ च्या ईशान्येस थोड्या अंतरावर आहे. याचे जवळच एक दुसरें मंदिर आहे. त्यांत बुद्धाची बसलेली एक मोठी मूर्ति आहे. त्याचे समोर एक गुप्तकालीन ( इ.स.४०० ) लहानसा स्तंभ आहे. येथून पूर्वेकडे सुमारें एक फर्लांगावर उंचवट्यावर बांधिलेलें एक शिखरदार मंदिर आहे. तेंही भगवान् बुद्धाचें आहे. त्याचा काल सुमारें इ० स० १० वें ११ वें शतक असावा. मुख्य स्तूपावर बौद्ध चरित्रांतील अनेक प्रसंगाचीं चित्रें आहेत. पण त्यांत बुद्धाची मूर्ति कोठेंच नाहीं स्तूप, अश्वत्थ (बोधि) वृक्ष, चरणपादुका अथवा त्रिरत्न (एक प्रकारचा त्रिशूल) अशा लाक्षणिक चिन्हांनीं बुध्दाचें सांनिध्य, जरूर पडलें तेथें, सूचित केलें आहे. प्रथम प्रथम बुध्दाची मूर्ति करीत नसत. पुढें त्याचीं मूर्ति करूं लागले व शेवटीं शेवटीं त्या मूर्तीचा इतका अतिरेक झाला कीं जिकडे तिकडे नक्षी कामांतही बुध्दाच्या मूर्तिच मूर्ति होऊन गेल्या. असो, ह्या इमारतीकडे जातांना वाटेत जें दगडां विटांनी बांधलेल्या चाकौनी कोठड्याचे अवशेष दिसतात ते विहार किंवा मठ होत. येथें बौद्ध भिक्षु आठ कोरडे महिने भ्रमण करून पावसाळ्याच्या चार महिन्यांत येऊन राहात

असत विहाराचे मध्यभागीं एक उघडा प्रशस्त चौक असे, चारी बाजूस लहान लहान कोठड्या असत. त्यांत भिक्षु रहात. यावरून लक्षांत येइल कीं विहाराची रचना कांहींशीं हल्लींच्या कालेजांतील विद्यार्थी वसतिगृहाप्रमाणेंच असे. विहारांच्या अवशेषां मधून गोलाकार दिसतात ते लहान लहान स्तूपाचे पाये आहेत. बहुतेक स्तूप बुद्धाचा किंवा एखाद्या पूज्य भिक्षुचा कांहीं अवशेष (दात, अस्थि, भिक्षापात्र, इत्यादि) आंत ठेऊन त्यावर बांधीत व त्याची पूजा करीत. पुढें पुढें गृहाकृति मंदिरें बांधूं लागले. व त्यात मूर्तिपूजा सुरूझाली. कित्येकदां एक एक मंदिर बांधण्यास वेगवेगळे लोक थोडी थोडी वर्गणी देत असत. उदाहरणार्थ मुख्य स्तूपाचें रेलिंग (कम्पाउन्ड) बांधण्यास अनेक लोकांनीं साहाय्य केलें आहे. ज्या दगडाचा खर्च ज्यानें दिला त्याचें नांव त्या त्या दगडावर खोदलें आहे. पुराणवस्तुसंग्रहालय टेकडीच्या ईशान्य कोन्यावर आहे. टेकडीवर उत्तरेकडील मुख्य घाटानें चढावें व पश्चिमेकडील रस्त्यानें उतरावें म्हणजे उतरताना अर्ध्या रस्त्यावर स्तूप नंबर २ पहावयास मिळतो.

सांची हें पुराणांतरी प्रसिद्ध असलेल्या विदिशा नगराचें तपोवन होय. विदिशा नगराचें नांव बौद्ध ग्रंथांत बसनगर असें आढळतें व सांचीच्या उत्तरेस पांच

मैलांवर ज्या प्राचीन नगराचें ठिकाण आहे व ज्यास सध्यांही बेस किंवा बेसनगर असें म्हणतात हेंच प्राचीन विदिशा नगर होय. दोन प्रहरीं नगरांतून भिक्षा आणून भिक्षुलोक तपोवनांत तपश्चर्या व धार्मिक चर्चा करीत रहात. सांचीच्या पुढचें रेल्वे स्टेशन भेलसा. या स्टेशन पासून दोन मैलांवर ज्यामध्येस बेतवा ( वेत्रवती ) व बेस या नद्यांच्या चिमट्यांत बेसनगरचे अवशेष आहेत. येथें प्रयोगा दाखल थोडें खणण्याचे काम केले होतें व विटांचीं घरें, यज्ञशाळा, जुनीं नाणीं, मातीच्या लेखयुक्त मोहरा, मृत्तिका पात्रें, लोखंडी हत्यारें वगैरे बरेच प्राचीन पदार्थ मिळाले ते ग्वाल्हेर येथील प्राचीन-वस्तु-संग्रहालयांत ठेविले आहेत. येथील एक अवशेष मात्र अपूर्व आहे. तो म्हणजे हेलिओडोरसचा गरुडस्तंभ (ज्यास स्थानिक लोक खांब बाबा म्हणतात तो) होय. ई० स. पूर्वी १५० चे सुमारास पंजाबांत तक्षशिला येथें ॲंटिआल्किडास नांवाचा ग्रीक राजा राज्य करीत होता ( अलेक्झँडरच्या स्वारी नंतर पंजाबचा कांहीं भाग कांहीं काळपर्यंत ग्रीक लोकांच्या अमलाखालीं होता ) त्याचा वकील ( यवनदूत ) हेलिओदर ( हेलिओडोरस ) मध्यदेशच्या भागभद्र राजाच्या दरबारीं आला होता. त्यानें भागवत धर्म स्वीकारून भगवान् वासुदेवाच्या प्रीत्यर्थ हा गरुडस्तंभ

उभारिला. अशा अर्थाचा पाली भाषेतील शिलालेख या स्तंभावर आहे. स्तंभ अद्याप स्वस्थानीं उभा आहे. मात्र त्याच्या वरील गरुडाची मूर्ति पडून गेली आहे. हा स्तंभ वेस नदीच्या उत्तर तीरावर आहे. विदिशा नगरीच्या सभोंवार कोट होता त्याचीं चिन्हें अजून दिसतात.

विदिशेच्या (बेसनगरच्या) पश्चिमेस दोन मैलांवर उदयागिरि नांवाची एक टेकडी आहे. तिचे पूर्व बाजूत लहान लहान लेणी कोरलीं आहेत. एकन्दर लेण्यांची संख्या वीस असून त्यां पैकीं दोन जैनांची व बाकीची हिन्दूंची आहेत. हिंदु लेण्यामध्यें कांहीं शैवांचीं व इतर-वैष्णवांचीं आहेत. लेण्यांतील देवतांच्या कोरीव मूर्ति फार सुन्दर आहेत. हें काम भारतीय कलेच्या सुवर्ण युगांतील म्हणजे इ. स. ४००-५०० च्या दरमियानचें आहे. येथील वराह अवताराची भव्य मूर्ति प्रेक्षणीय आहे. या लेण्यावर चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या वेळचे दोन व कुमारगुप्ताच्या वेळचा एक असे तीन संस्कृत शिला लेख आहेत. टेकडीचे माथ्यावर एका मोठ्या मंदिराची खुर्ची व एका मोठ्या शिलास्तंभाचे तुकडे आहेत.

भेलसा स्टेशनपासून होलीओदरच्या स्तंभापर्यंत दोन मैल पक्की सडक आहे. पण पुढें उदयागिरीपर्यंत फक्त

कच्चा रस्ता आहे. वाटेंत बेतवा व बेस नद्या उतराव्या लागतात. त्यावर रपट आहे. बेतवा नदीचे पात्रांत चरण तीर्थ नांवाचें एक स्थान आहे. तेंही रम्य आहे. तेथें रामाच्या चरणपादुका दाखवितात. पेशव्यांच्या वेळचीं दोन देवाळयेंही या ठिकाणीं नदीचे पात्रांत खडकावर बांधलेली आहेत. हें सर्व पहाण्यास एक सर्व दिवस खर्ची घालावा लागतो.

भेलसा हा जिल्हा ग्वाल्हेर संस्थानचा आहे. या जिल्हांत ग्यारसपुर, पठारी, बडोह, इत्यादि ठिकाणीं मध्य युगांतील अनेक मंदिरांचे अवशेष सांपडले आहेत. परन्तु बहुतेक रेल्वे लाइनीपासून बऱ्याच अंतरावर असल्यानें प्रेक्षकांना चांगली फुरसद असल्याशिवाय ते पहातां यावयाचे नाहींत. मात्र बरेठ स्टेशनपासून ( पूर्वेस ) चार मैलांचे अंतरावर उदयपुर नांवाच्या गांवीं उदयादित्य परमार राजानें अकराव्या शतकांत लाल दगडांनीं बांधलेलें उदयेश्वर नांवाचें शिव मंदिर फारच सुंदर व अद्याप चांगल्या स्थितींत आहे. तें पाहतां येण्यासारखें आहे. याच मंदिराच्या आवारांत यांच्या समकालीन वैद्यनाथा ( शिवा ) चें एक मंदिर होतें तें पाडून त्याच्या दगडांनीं बांधिलेली एक मुसलमानी मसजिद आहे, परंतु मूर्तिभंगा पलीकडे या उदयेश्वर मंदिराला फारसा धक्का पोंहचलेला नाहीं. एका शिलालेखावरून कळतें कीं

उदयादित्यानें या स्थळीं तीन गोष्टी केल्या व त्यांस आपलें नांव दिलें एक उदयपुर नांवाचें गांव बसविलें, दुसरें उदयसमुद्र नांवाचा तलाव बनविला व तिसरें उदयेश्वर नांवाचें शिवालय बांधविलें. तिन्हींही अद्याप अस्तित्वांत आहेत. थोडें पुढें गेल्यावर बीना जंक्शनपासून १०-१२ मैलांवर एरण या गांवाजवळ गुप्तकालीन दोन सलेख स्तंभ, एक दोन विष्णु-मंदिरें व एक फार प्राचीन सतीस्तंभ आहे. सतीस्तंभावरील लेख इ. स. ५१० मधील असून गोपराज लढाईंत कामास आला व त्यांची स्त्री सती गेली अशा मजकुराचा आहे. यापेक्षां अधिक जुना सतीस्तंभ कोठे पाहण्यांत नाहीं. एरण येथील प्रसिद्ध वराह अवताराची मूर्ति लहानशा हत्ती एवढी असून तिचे कंठावर हूणराजा तोरमाणाचे वेळचा लेख आहे.

बीन्याचे उत्तरेस सुमारें तीस मैलांवर जाखलोन नांवाचें रेलवे स्टेशन आहे. तेथून पश्चिमेस आठ नऊ मैलांवर बेतवा नदीचे काठीं देवगढ नांवाचा लहानसा डोंगरी किल्ला असून त्यामध्यें जैनधर्मीयांची कियेक प्राचीन मंदिरें ९ व्या १० व्या शतकांतील आहेत. त्यांत त्यांच्या तीर्थंकरांच्या व इतर देवतांच्या शेंकडों पाषाण मूर्ति आहेत. किल्ल्याच्या पायथ्याशीं एक गुप्तकालीन ( ५ व्या ६ व्या शतकांतील ) देवालय आहे.

त्या वरील मूर्तींचें काम फार चांगले असून त्यांत रामयणातील प्रसंगांचीं व इतर पौराणिक कथांचीं चित्रें दगडांत कोरलीं आहेत.

जाखलोनहून तिसरें स्टेशन ललितपुर. येथून पश्चिमेस २१ मैलांवर प्रसिद्ध चंदेरीचा किल्ला व शहर आहेत. ललितपुराहून चंदेरीपर्यंत बऱ्यापैकीं सडक आहे. ललितपुरास गाड्या, तांगे व क्वचित टॅक्सी ही भाड्यानें मिळतात. अर्ध्या वाटेंत राजघाटाच्या रपटेवरून बेतवा नदी ओलांडावी लागते चंदेरीचा किल्ला इतिहासप्रसिद्धच आहे. येथें अनेक महाल, तलाव, बावड्या, कबरी, व मशीदी असून दगडावरील नक्षीचें काम उत्तम तऱ्हेचें पाहावयास मिळतें. कोशक महाल, राजा का महाल, कटीघाटी व बादलमहाल दरवाजा, जामा मसजीद, परमेश्वरी ताल, शहाजादींका रोजा, बडा मदरसा, निजामुद्दीन घराण्यांच्या कबरी वगैरे इमारती प्रेक्षणीय आहेत. या सर्व मांडवा सुलतान व बुंदेले राजे यांच्या वेळीं बांधिल्या आहेत एक ठिकाणीं पहाडांत कोरीव जैन मूर्तिहि आहेत. चंदेरी तलम सुताच्या व जरीच्या कपड्या विषयीं सर्वत्र विश्रुतच आहे. या उद्योग धंद्याच्या अभिवृद्धीसाठीं ग्वाल्हेर सरकारनें तेथें एक हात मागाचा कारखाना मोठ्या प्रमाणावर चालविला आहे त्यांत कोष्ट्याच्या मुलांनां स्कॉलरशिप देऊन विणकाम नवीन

पद्धतीचें शिकण्याची सोय केली आहे. या चंदेरीपासून ८ मैल उत्तरेस डोंगरांत मुसलमानाचे पूर्वीच्या हिंदू राजांची चंदेरी आहे तेथें अनेक प्राचीन जैन मंदिरें व मूर्ति आहेत. ते शहर आतां ओसाड व अरण्यवेष्टित असून तेथें वाघ, अस्वलें इत्यादि हिंस्र पशूंची विपुळ वस्ती आहे.

ललितपुरच्या उत्तरेस ५०।५५ मैलावर झांशी हें महाराष्ट्रीयांच्या मनास चटका लावणारें इतिहासप्रसिद्ध शहर आहे. राणी साहेबांच्या किल्ल्यावर आतां ब्रिटिश यूनियन जॅक फडकत आहे. किल्ल्यांत गोरी शिबन्दी असून किल्ला पाहण्याकरितां तेथील अधिकाऱ्याकडून अगोदर परवाना मिळवावा लागतो. किल्ल्यांत एक शिवमंदिर असून दर महाशिवरात्रीस तेथें जत्रा भरते. त्या दिवशीं मात्र देवदर्शनार्थ किल्ल्यांत जाऊन येण्याची हवें त्यास मुभा असते. झांशी शहर स्टेशनवरून सुमारें दोन मैल लांब आहे. तांगे पुष्कळ मिळतात. झाशीचें आधुनिक महत्व विशेषेंकरुन जी. आय. पी. रेलवेच्या डिवीजनल कचेऱ्या व मोठें वर्कशाप या मुळेंच आहे. येथें यामुळेंच थोडी बहुत महाराष्ट्रीयांची नवी वस्ती असून सर्व मंडळी उत्साही व एकजुटीनें वागणारी आहेत.

झांशीच्या उत्तरेस ६० मैल अंतरावर ग्वाल्हेर आहे, या दोहोंच्या बरोबर मध्यावर डबरा नांवाचें स्टेशन

लागतें, तेथून नैर्ऋत्येस अजमासें १२ मैलांवर सिंधु व पारा (पार्वती) या नद्यांच्या संगमावर प्राचीन काळीं प्रसिद्धि पावलेल्या पद्मावती नगराचें ठिकाण आहे. पुराण प्रसिद्ध नागराजांच्या तीन राजधान्यांपैकीं पद्मावती ही एक राजधानी होती. भवभूति कवीनें आपल्या मालतीमाधव नाटकांत केलेलें पद्मावतीचें भौगोलिक वर्णन या स्थळांशी अगदीं तंतोतंत जुळतें. पारा-सिंधु नदींच्या संगमावर असलेलें शहर, सिन्धु नदीचा तटप्रपात (धबधबा) सिन्धु व मधुमतीच्या संगमावरचें सुवर्णबिन्दु शिव हीं सर्व ठिकाणें आतां सांपडलीं आहेत. येथें जमीनीच्या गर्भात विटांनीं बांधलेल्या घरांच्या मोडक्या तोडक्या भिंती, नाणीं, मृत्तिकापात्रें, मूर्ति इत्यादि ई. स. च्या पहिल्या ५, ६ शतकांतील अनेक अवशेष जमीन खोदल्यानंतर आढळून आले आहेत. येथून जवळच सिंधु नदीच्या तीरावर धबधब्याजवळ अत्यंत रमणीय ठिकाणीं ओरछाच्या वीरसिंहदेवानें बांधलेलें धूमेश्वर नांवाचें शिवमंदिर आहे.

डबरा व ग्वाल्हेर यांचे दरमियान अंतरी या गावीं अकबरचा वजीर व इतिहासकार अबुल फजल याची लहानशी कबर आहे. जहांगीरचे सांगण्यावरून वीरसिंह देवानें ज्या ठीकाणीं अबुल फजलचा खून केला त्याच

ठिकाणीं ही कबर मागाहून बांधली गेली आहे. आंतरी स्टेशनापासून ही दीड मैल आहे.

ग्वाल्हेरच्या पुढें उत्तरेस आगरा, फतेपूरसिक्री, मथुरा, दिल्ली, व ईशान्येस, कानपूर, लखनौ वगैरे कित्येक इतिहासप्रसिद्ध व प्रेक्षणीय स्थळें आहेत. तीं सर्वांस माहित असल्यामुळें तसेंच स्थलसंकोचास्तव, त्यांचें वर्णन येथें करणें इष्ट किंवा आवश्यक नाहीं; तथापि ग्वाल्हेरच्या जवळ असलेलें उन्हाळयांतील हवाशीर ठिकाण जें शिवपुरी तें महाराष्ट्रांत विशेष माहीत नसल्यामुळें त्याचें संक्षिप्त वर्णन देणें येथें जरूर वाटतें.

शिवपुरी हें ग्वाल्हेर संस्थानचें हवाशीर ठिकाण आहे. उन्हाळयांत सरकारचें मुख्य ठाणें तेथेंच असतें, यांसाठीं तेथें एक राजवाडा, कचेऱ्याकरितां मध्यवर्ती सेक्रेटरीयट ची इमारत, व ऑफीसरांकरितां बंगले बांधले आहेत. शिवपुरी ग्वाल्हेरपासून सुमारें ७२ मैल आहे. आग्रा-मुंबई सडक शिवपुरी व लष्कर यांस जोडते. याशिवाय ग्वाल्हेर लाइट रेल्वेचा फाटाही ग्वाल्हेरहून शिवपुरीस जातो. शिवपुरीच्या आस पास शिकारीचें जंगल व नैसर्गिक रमणीय स्थळें पुष्कळ आहेत व मुख्यतः या कारणानेंच कै. माधव महाराजांस हें स्थान फार आवडलें. या जंगलांत सध्यां वाघ विपुल आहेत. पूर्वी येथें जंगली हत्तीही असत व

मोंगल बादशहा हत्तींच्या शिकारीसाठीं येथें येत. इंग्रजांची छावणी ही कांहीं दिवस येथें होती. माधव महाराजांनीं कोट्यावधी रुपये खर्च करून शिवपुरीस नंदनवन बनविलें आहे. शिवपुरीच्या सभोंवार शेकडों मैलांच्या सडकांचें जाळें तयार केलें आहे. सर्व नैसर्गिक रमणीयतेचीं स्थळें शोधून काढून तेथें बंगले, तलाव, हवा खाण्याच्या जागा तयार केल्या आहेत. सर्व ठिकाणीं जाण्यास पक्क्या सडका असल्यामुळें मोटारींतून हवें तेथें वायुवेगानें जातां येतें. येथून चार मैलावर सख्यासागर नांवाचा विस्तीर्ण तलाव नौका क्रीडेसाठीं तयार केला आहे तो पाहण्यासारखा आहे. याशिवाय भूराखो, माधवेश्वर मंदिर व १२ मैलांवर असलेल्या सुरवाया गढीतील हजार वर्षांचीं जुनी मंदिरें व मठ हीं पाहण्याजोगी आहेत. पण शिवपुरी येथील सर्वांत मुख्य प्रेक्षणीय ठिकाण म्हणजे छत्री. माधवराव महाराजांनीं शहाजहानच्या ताजमहालाशीं स्पर्धा करण्यासाठींच कीं काय आपल्या मातुश्रीची छत्री लाखो रुपये खर्च करून येथें बनविली आहे. फरक एवढाच कीं ताजमहालांत शहाजहानचें पत्नीप्रेम प्रकट झालें आहे, तर येथें माधव महाराजांची उत्कट मातृभक्ति मूर्त स्वरुपांत परिणत झाली आहे. छत्रीच्या भोंवतीं सुंदर बाग, जलाशय, देवालयें व ही बनाविलीं आहेत. मृत्युपत्रांत लिहून ठेविल्या

प्रमाणें खुद माधव महाराजांची छत्रीही याच बगीच्यांत माते-श्वरीच्या छत्रीच्या शेजारीं तयार करण्याचें काम चालू आहे. शिवपुरीहून ६० मैल पूर्वेस झांशी आहे व दोन्हीं शहरामध्यें चांगली पक्की सडक असून मोटर सर्विसही आहे. ग्वाल्हेरहून शिवपुरीस ग्वाल्हेर लाइट रेल्वे नें जाऊन उपरिनिर्दिष्ट प्रेक्षणीय स्थळें पाहून पुढें तसेंच मोटारनें झांशीस जाणें सोईचें पडतें.

## ग्वाल्हेर.

सध्याचें ग्वाल्हेर, १ जुनें ग्वाल्हेर, २ लष्कर व ३ मुरार या तीन निरनिराळया शहरांचें मिळून झालेलें आहे.

जुनें ग्वाल्हेर ग्वाल्हेरच्या प्रसिद्ध किल्याच्या पायथ्याशीं उत्तर व पूर्व बाजूस वसलेलें आहे. हें शहर बहुतेक मुसल-मानी पद्धतीचें आहे. जें या तीन शहरांत लष्कर सर्वांत मोठें आहे तें दौलतराव शिंद्यांनी इ. स. १८१० चे सुमारास वसविलें. शिंद्याची मूळ राजधानी उज्जयिनी येथें होती पण पुढें दिल्लीच्या आसपास उत्तर हिन्दुस्थानांत कोठें तरी आपलें मुख्य ठिकाण असणें राजकीय कारणांनी इष्ट वाटल्यावरून दौलतरावांनीं ग्वाल्हेर पसंत केलें व तेथें आपल्या सैन्याचा ( लश्करचा ) तळ दिला.

कांहीं दिवस गेल्यावर शिंद्यांच्या निरनिराळ्या सरदारांनीं आप आपले डेरे उखडून टाकून त्या ठिकाणीं वाडे बांधले व आपल्या आश्रितांस व परिवारास हीं आपल्या वाड्याभोंवतीं राहतीं घरें बांधून दिलीं. या मुळेंच या शहराची विभागणी, आंग्र्यांचा गोठ, शिंद्यांची छावणी इत्यादि गोठांत झाली आहे.

मुरार हें सर्वांत शेवटचें शहर होय. हें मुरार नदीच्या कांठीं आहे. याची रचना इंग्रजांनीं केली व ती अर्थातच विलायती थाटावर, मोठ्या रुंद व सरळ सडका, दूर दूर अंतरावर उपवन-वेष्टित बंगले बाधून केली आहे, येथें प्रथम इंग्रजी फौजेची छावणी होती. आतां ती उठून सर्व शहर शिंद्यांच्या अमलांत आलें आहे. येथेंच रेसीडेन्ट साहेब व बरेच बडे बडे हिंदुस्थान अधिकारीही राहतात.

हीं तीन्हीं शहरें एकमेकांपासून सुमारें दोन दोन मैलाच्या अंतरावर असून एकमेकांशीं मोठमोठ्या सडकांनीं जोडलेलीं आहेत, हें या सोबत दिलेल्या नकाशावरून स्पष्ट होईल. मुख्य रेल्वे स्टेशन जी. आय. पी. चें ग्वाल्हेर हें होय. हें तीन्हीं शहरांना जवळ जवळ मध्यवर्ती आहे, परंतु मुरारला कांहींसें दूर पडतें. या स्टेशना-जवळच युरोपियन तऱ्हेनें राहणाऱ्या लोकांकरितां ग्रँड हॉटेल, व हिंदुस्थानी पद्धतीनें राहण्यासाठीं पार्क हॉटेल

या दोन हॉटेल्स असून येथें राहण्याची व खाण्यापिण्याची सर्व आधुनिक सुखसोय आहे. विजेचे दिवे व पंखेही आहेत. याशिवाय डफरिन सराईंत लहान लहान खोल्या किंवा मोठे सोपे भाड्यानें मिळतात व जवळ श्रीकृष्ण धर्मशाळा आहे. तींत फुकट उतरण्याची सोय आहे. याचे जवळच वाटसरूंनां लागणाऱ्या मिठाई वगैरे खाद्य पदार्थांचीं दुकानें विपुल आहेत ग्वाल्हेरच्या स्टेशनावर तांगे पुष्कळ मिळतात. व्हिक्टोरिया किंवा टॅक्सीज यांचा रिवाज अद्याप येथें नाहीं, मात्र ग्रँड हॉटेलमध्यें उतरणाऱ्यांना हीं वाहनें ट्रान्सपोर्ट खात्यांकडून मिळण्याची व्यवस्था आहे. मुरार नांवाचें दुसरें एक स्टेशन जी. आय. पी. चेंच आहे, पण तेथें रहदारी विशेष नसते व वाहनें मिळण्यास अडचण पडते या शिवाय जी. आय. पी. रेलवे च्या ग्वालियर स्टेशना जवळच ग्वालियर लाइट रेलवेचें ग्वालियर स्टेशन आहे, तेथून लष्कर व मुरारकडे लोकल गाड्या जातात व शिवपुरी, भिंड, व शिवपूर या तीन जिल्ह्यांकडेही लाइट रेलवेचे फांटे आहेत. मुरारांत एक व लश्करांत चार लाईट रेलवेची लहान स्टेशनें आहेत.

ग्वाल्हेरचें हवापाणी महाराष्ट्राप्रमाणें समशीतोष्ण नाहीं. उन्हाळ्यांत उन्हाळा फार व हिवाळ्यांत थंडी फार असते; परंतु हें हवामानही अलीकडे बदलत चाललें असून

तें दिवसें दिवस अधिकाधिक सौम्य होऊं लागलें आहे. दहा बारा वर्षां पूर्वींच्या व सध्याच्या स्थितींत स्पष्ट जाणवण्या सारखा फरक झाला आहे; व कांहीं वर्षांत येथील हवा माळवा किंवा महाराष्ट्र यांचे प्रमाणें समशीतोष्ण व सुखकर होईल अशीं सुचिन्हें दिसत आहेत.

इतर जुन्या शहरांप्रमाणें लष्कर व जुन्या ग्वाल्हेर शहरांतही लहान गल्लया व गलिच्छ वस्ती वऱ्याच ठिकाणीं होती. कैलासवासी प्रजावत्सल माधव महाराजांनीं सिटी इम्प्रूव्हमेन्ट खातें स्थापन करून या बाबतींत पुष्कळ सुधारणा घडवून आणली आहे. आतां शहरांत मोठमोठ्या सडका, जागजागीं बागा व लोकांना बसण्या फिरण्या सारखीं मोकळीं मैदानें केलीं गेलीं आहेत व करण्याचें काम चालू आहे. शहरांत म्युनिसिपालटीची व्यवस्थाही चांगली आहे. रस्त्यांची सफाई व पाणी छिडकाई बरी असते. शहरांत चहूंकडे विजेचे दिवे आहेत. घरोघरीं पाण्याच्या विहिरी आहेत. येथें विहिरींचें पाणीं जमीनीपासून फार खोल नाहीं व विपुल आहे, पण तें असावें तितकें गोडें नाहीं व दिवसेंदिवस तें अधिकाधिक खारें होण्याकडे प्रवृत्ति आहे. पण येथें नळाचें पाणीं आणण्याचें काम चालू असून एकदोन वर्षांचें आंत

शहरांत नळ होतील व ही गोड्या पाण्याची अडचण दूर होईल.

ग्वाल्हेर, लष्कर, व मुरार या तिहींची मिळून एकंदर वस्ती सुमारें ८०,००० आहे. त्यांत महाराष्ट्रीयांची लोकसंख्या २०,००० पर्यंत भरेल. बाकी वस्ती बनिये, ठाकुर, कायस्थ, व इतर रांगडे लोक व मुसलमान यांची आहे.

येथवर ग्वाल्हेर शहराचें सामान्य वर्णन झालें, आतां त्यांतील प्रेक्षणीय स्थळांची संक्षिप्त माहिती देतों.

प्रेक्षणीय स्थळांचे दोन भाग पडतील—१ प्राचीन, २ अर्वाचीन. यांची यादी खालीं दिली आहे.

१. **प्राचीन**—१. किल्ला व त्यांतील इमारती. २. तानसेनाची कबर, ३. आर्केआलॉजिकल म्युझियम, ४. महम्मदघोसचा दर्गा.

२. **अर्वाचीन**—१ पब्लिक पार्क, २ जयविलास महाल, ३ मोतीमहाल, ४ एलजिन क्लब, ५ व्हिक्टोरिया कॉलेज, ६ जयारोग्य हास्पिटल, ७ स्टेट इन्जीनियरिंग वर्क्स, ८ पॉटरी वर्क्स, ९ अलिजाह दरबार प्रेस, १० जयाजी चौक, ११ गोरखी किंवा जुना राजवाडा, १२ जनरल पोस्ट ऑफिस, १३ टाउन हाल, १४ हायकोर्ट, १५ राजघराण्याच्या छत्र्या, १६ सराफा, बाजार १७पॉलीटेक्निक

इंस्टिट्यूट, १८ इंडस्ट्रियल शोरूम, १९ रेस कोर्स, २० जयाजीराव काटन मिल, २१ लेदर फॅक्टरी, (मुरार), २२ जेल.

ग्वाल्हेर किल्याचें सचित्र वर्णन Gwalior Fort Album या इंग्लिश पुस्तकांत (किंमत १॥ रुपया) किंवा त्याच्या हिंदी भाषांतरांत (किंमत १ रुपया) पहावें. हीं पुस्तकें संमेलनाच्या आफिसांत विकत मिळतील.

**किल्ला**—काशीस जाऊन जसें श्रीविश्वेश्वराचें दर्शन घ्यावयाचें किंवा गंगामाईचें स्नान करावयाचें, तें केल्यावांचून जसें काशीस जाणें निष्फळ तसेंच ग्वाल्हेरीस येणाऱ्या प्रत्येक माणसास किल्ला पाहणें अगत्याचें आहे. किल्या वांचून ग्वाल्हेर म्हणजे हॅमलेटच्या भूमिके रहित हॅमलेट च्या नाटकाप्रमाणेंच नीरस होईल.

ग्वाल्हेरचा किल्ला हिंदुस्थानांतील अत्यंत प्रसिद्ध व मजबूत किल्यांत मोडतो. नैसर्गिक भव्यता, प्राचीनत्व, पुराण वस्तूंचे अवशेष, ऐतिहासिक महत्व व लष्करी अभेद्यता इत्यादि गुण याच्या प्रमाणें इतर किल्ल्यांत क्वचितच आढळतील. एका मुसलमान इतिहासकारानें यास हिंद-मातेच्या दुर्गमालेतील कंठमणीची उपमा दिली आहे. ती यथार्थ नाहीं असें कोण म्हणेल ? प्राचीन शिलालेखांतून

याचें नांव 'गोपाचल, गोपागिरी, गोपाद्रि, इत्यादि, 'गवळयांची टेकडी' अशा अर्थाचें आढळतें, मथुरेजवळचें गोकुळ व हा गोपाचल एका मोठ्या गवळयांच्या वसाहतीचेच भाग असल्यास आश्चर्य नाहीं. हा किल्ला कधीं व कोणी बांधिला याची विश्वासनीय माहिती उपलब्ध नाहीं. सूरजसेन नांवाच्या एका कछवाहा रजपूत राजानें येथील सूरज कुंडांतील पाण्याच्या प्रभावानें कुष्टरोगमुक्त झाल्यामुळें ग्वालिप नांवाच्या साधूच्या आदेशावरून हा किल्ला बांधिला अशी एक दन्तकथा आहे. इ. सन ५२५ च्या सुमाराचा सूर्य मंदिरावरील एक संस्कृत शिलालेख येथें मिळाला आहे व किल्ला त्याहीपूर्वी अस्तित्वांत होता येवढें निश्चित आहे. या किल्ल्यावर ज्या अनेक प्राचीन व अर्वाचीन इमारती व शिलालेख व मूर्ति वगैरेचे अवशेष आहेत, त्यावरून या किल्ल्यानें गुप्त, हूण, प्रतिहार, कछवाहा, तोमर, लोदी, मोंगल, इंग्रज व मराठे, इत्यादि कितीतरी राजांच्या राजवटी पाहिल्या आहेत याची साक्ष पटते. तसेंच या किल्ल्यानें अनेक लढाया, वेढे, रक्तपात, राजकीय खून, जोहार तसेंच मोठमोठे धार्मिक पूजाविधि, आणि नाचरंग पाहिले आहेत.

हा किल्ला एका लांब आणि रुंद टेकडीवर बांधिला आहे. टेकडीची दक्षिणोत्तर लांबी सुमारें $1\frac{3}{4}$ मैल व पूर्व पश्चिम

रुंदी ६०० फुटापासून २८०० फुटापर्यंत आहे. उंची सुमारें ३०० फुट आहे. किल्ल्यावर जाण्याला दोन रस्ते आहेत. (पूर्वी आणखीही दोन तीन वाटा किल्ल्यावर जाण्यास होत्या, त्या आतां बन्द केल्या आहेत.) पश्चिमेकडील उरवाही रस्ता व पूर्वेकडील ग्वालियर रस्ता. उरवाही रस्त्याचा चढाव क्रमा क्रमाचा असल्यामुळें पायीं जाणाऱ्या प्रेक्षकांस इकडून चढणेंच अधिक सोईचें होतें. पायथ्याच्या उरवाही दरवाज्यापर्यंत टांगा जाऊं शकतो. या दरवाज्याशीं शिपायांचा पहारा आहे. तेथें प्रत्येक माणसीं दोन आणे दिले म्हणजे. पास विकत मिळतो, तो बरोबर ठेऊन किल्ल्याच्या बाहेर जातेवेळीं पहारेकऱ्यास द्यावयाचा असतो.

उरवाही दरी या किल्ल्याचें मर्मस्थळ आहे असें पाहून येथील दरवाजा व बाहेरचा कोट अल्तमश बादशाहानें बांधला असें म्हणतात. या रस्त्यानें वर चढतेवेळीं आपल्या दोहों बाजूस जैन तीर्थंकरांच्या अनेक लहान मोठ्या मूर्ति पहाडांत कोरलेल्या दिसतात. यापैकीं पुष्कळांवर शिलालेख आहेत त्यावरून कळतें कीं त्या डुंगरसिंह तोमर राजाच्या कारकिर्दीत इ० सन १४४० ते १४७३ च्या दरम्यान कोरल्या गेल्या व त्यानन्तर ५०।५५ वर्षांनीं बाबरच्या हुकुमानें यांचा भंग करण्यांत आला. यांतील सर्वांत मोठी मूर्ति सुमारें

५७ फूट उंचीची आहे. अशा मूर्ति किल्ल्याच्या टेकडीच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर, अशा सर्व बाजूंवर कोरल्या आहेत. संख्येनें व आकारानें एवढ्या मोठ्या जैन मूर्ति उत्तर हिंदुस्थानांत तरी इतर कोठें नाहींत.

या रस्त्यानें पुढें गेल्यावर पुन्हां एक दरवाजा लागतो तेथेंच उजव्या हाताकडे एक दगडी जिना आहे. त्यानें वर चढून ठेकडीच्या माथ्यावर आल्यावर एक प्रशस्त सडक लागते तिनें सरळ दक्षिण दिशेकडे चालावें. नैऋत्येकडे एक फाटा जातो तो सोडून द्यावा. या सडका व इंग्लिश पद्धतीच्या ज्या मोठमोठ्या बराकीवजा इमारती पुढें दिसतील त्या शिपायांच्या बंडानंतर इ० सन १८५७ ते १८८६ पर्यंत इंग्रजांच्या ताब्यांत किल्ला असल्यावेळीं बांधल्या आहेत. या बराकींत आतां सरदारांच्या मुलांची शाळा, बोर्डिंग, व शिक्षकांना राहण्याच्या जागा आहेत. यापैकीं एकांत किल्लयावरील कमांडिंग आफिसरही राहतात. त्यांची किल्लयावर देखरेख असते. या रस्त्यानें जरा पुढें गेलें ह्मणजे जो एक खोल व चौकोनी बांधलेला तलाव लागतो तो सूर्यकुंड होय. त्यांतील पाण्यानें किल्याच्या प्रस्थापकाचें सूर्यसेनाचें कुष्ट बरें झालें अशी दंतकथा आहे. याचे कांठीं पूर्वी एक सूर्य मंदिर होतें तें आतां नष्ट होऊन त्याचेच जागेवर एक नवें सूर्य मंदिर कांहीं वर्षांपूर्वी बांधलें गेलें आहे. जवळ एक शिव-

मंदिर ही आहे. आणखी एक फर्लांग पुढें गेल्यावर उजव्या हाताकडे एक उंच मंदिर दिसतें, तेंच तेली मंदिर होय. याची जमिनीपासून शिखरापर्यंतची उंची सुमारें ११० फूट असून ही किल्ल्यावरील सर्वांत ऊंच इमारत आहे. याचें शिखर द्राविडी पद्धतीचें व खालचा भाग आर्य पद्धतीचा आहे. द्राविडी पद्धत उत्तर हिंदुस्थानांत इतरत्र क्वचितच आढळते. याचें मूळ नांव तेलंगण मंदिर असावें व तें त्याच्या तेलंगणी किंवा द्राविडी रचनेवरून पडलें असावें कालवशांत लोक या नांवाचा अर्थ विसरले व त्यास तेली मंदिर म्हणूं लागले व तें नांव अन्वर्थक करण्यासाठीं तेलणीची काल्पनिक दंतकथा रचली गेली या मंदिरासमोरच गंगोलाताल या नांवाचा जुना तलाव आहे. हें मंदिर पूर्वी विष्णूचें होते; त्याच्या दरवाज्यावर गरुडाची मूर्ति आहे. हें देवालय येथील इतर मंदिरा प्रमाणेंच आतां ओसाड आहे. दरवाज्यांच्यां दोन्ही बाजूस गंगायमुनांच्या मूर्ति आहेत.

येथून सडकेनें समोर दक्षिणेकडे अर्धा मैल गेले असतां सरदार्स स्कूलची इमारत लागते, व पुढें समोर पाव मैल गेल्यावर किल्ल्याच्या दक्षिण कोटावर आपण पोहचतो. येथून फूलबाग, महाल व लष्कर शहराचा देखावा दिसतो, पण ज्यास अधिक वेळ नाहीं अशा प्रेक्षकांनीं तेली मंदिर पाहून तेथून पूर्वेकडे जाणाऱ्या रस्त्यानें जावें व मग डावीकडे

( उत्तरेस) वळावें येथून जवळच किल्ल्याचे पूर्व तटाजवळ असलेली सासबहू नांवाचीं जुनीं मंदिरें पहावीं. हीं मंदिरें आंता विराण आहेत. सासबहू म्हणजे हिन्दी भाषेंत सासू व सून. दोन सदृश वस्तु जवळ जवळ असल्या म्हणजे त्यापैकी एक सासूची व दुसरी सुनेची असें म्हणण्याचा प्रचार या प्रांतांत आहे. सांची येथील नंबर १ व ३ चे दोन स्तूप जवळ जवळ आहेत म्हणून त्यांस गांवढळ भाषेत सासबहूचे बीठे म्हणतात. तसेंच सास बहूच्या बावड्या हे नांवही बऱ्यांच ठिकाणीं आढळतें. असो. दोन्ही मंदिराचीं शिखरें पडून गेलीं आहेत. लहान मंदिराचा गाभाराही नष्ट झाला आहे व दोहोंचें ही सभामंडप व प्रवेशमंडपिका राहिल्या आहेत. दोहोंवर नक्शी काम चांगलें आहे. मोठ्या मंदिराचे आंतील भव्य खांब, नक्षीगदार छतें व दरवाजे प्रेक्षणीय आहेत. सर्व मन्दिरांत कोरीव काम नाहीं अशी जागा क्वचित् सांपडेल. मोठ्या मन्दिराचे प्रवेशद्वारा जवळ दोन्ही बाजूस प्रशस्त शिळावर कोरलेला संस्कृत लेख आहे. त्या वरून समजेंतकीं या मन्दिराचें बांधकाम कछवाहा वंशांच्या पद्मपाल राजानें सुरु केलें. त्याचा भाऊ महीपाल त्याचें मरणानंतर गादीवर बसल्यावर त्याचे कारकिर्दीत वि० संवत् ११५० त तें पुरें झालें. लहान मन्दिराजवळील तटावरून किल्याचे खालीं असलेल्या

जुन्या ग्वालियरचा व पूर्वे कडील प्रदेशाचा देखावा मोठा शानदार दिसतो.

येथून उत्तरेकडे सडकेनें कांही दूर गेल्यावर मान-मंदिर नांवाचा राजा मानसिंग याचा महाल लागतो. हा महाल तोमर राजा मानसिंग यानें इ. स. १५०० च्या सुमारास बांधला. हा राजा शिल्पकलेचा व गायन विद्येचा मोठा भोक्ता व आश्रयदाता होता. या महाला वर दगडाचें कोरीव काम असून त्यांत रंगी बेरंगी लहान लहान चमकदार विटा ( enamelled tiles ) बसवून बदकें अजगर, हत्ती, वाघ, केळीचीं झाडें इत्यादिकांच्या आकृती साधल्या आहेत. इतर नक्षीकाम तऱ्हेतऱ्हेचें आहे, व त्यांतही रंगीत विटा बसविल्या आहेत म्हणून यास शीशमहालही म्हणतात. यांत दोन चौक असून सभोंवार लहान लहान दालनें आहेत. प्रत्येक दालनांतील छताची रचना वेगवेगळी व चमत्कारजनक आहे. बाहेरील चौका-च्या उत्तरे कडील व दालनाचा नाटक गृहा सारखा उपयोग करीत असावे. वर चोहीं बाजूस जाळीदार गॅलरी आहे तेथें बसून राजकुलांतील माणसें तळ मजल्यावर चाललेलें दृश्य पहात असावीं या जाळीत रासक्रीडे सार-ख्या मूर्ति कोरल्या आहेत. जमिनीखालीं दोन मजली तळघर आहे. गच्चीं वर छत्र्या आहेत तेथून दिसणारा देखावा

प्रेक्षणीय आहे. महालाची पूर्व बाजू बाहेरून फारच भव्य व सुन्दर दिसते. ती सुमारें ३०० फुट लांब व ६० ते ७० फुट उंच आहे. तींत सहा वाटोळे उंच बुरूज आहेत. त्यावर घुमट्या आहेत. सर्व ठिकाणीं रंगाच्या विटांची नक्षी होती त्यांतील कांहीं शिल्लक आहे व एकंदरीत त्या महालानें किल्ल्याच्या पूर्वेकडील देखाव्यास फारच शोभा आणली आहे. महालाच्या दक्षिण अंगाची रचनाही साधारण अशीच आहे. मानमन्दिराचे उत्तरेस कांहीं रजपूत राजांच्या वेळचे व कांहीं मुसलमानी अमदानींतील महाल आहेत. यांची नांवें—करणमहाल, विक्रममंदिर, जहांगीरी, शहाजानी महाल इत्यादि आहेत. शेरशहाच्या वंशजांनीं येथें आपली राजधानीच केली होती. पण शिल्पशास्त्राच्या दृष्टीनें त्यांत कांहीं विशेष नाहीं व तेथें सध्यां दारू गोळयाचा कारखाना असल्यामुळें प्रेक्षकांना तेथें जाण्याची मुभाही पण नाहीं. याच आवारांत जोहारताल नांवाचा एक लहानसा तलाव आहे. त्याचे कांठीं मुसलमानांच्या प्रथम चढाईचे वेळीं स्त्रियांनी येथील रजपूत शेवटच्या लढाईस तोंड लागण्यापूर्वी जोहार केला होता. तसेंच घोंडा दरवाजा नांवाचा एक दरवाजा या बाजूस असून त्या लगत कांहीं कोठड्या आहेत. तेथें मुसलमानीं अमदनींत राजकैदी ठेवीत असत व त्यातून बहुतेकांस खुदाच्या

घरचा रस्ता येनकेन प्रकारणे दाखवीत असत. औरंगजेबचा भाऊ मुरादबक्ष याचा अंत येथेंच झाला. मानमंदिर पाहून झाल्यावर पूर्वेकडे रस्त्याच्या उतारास आरंभ होतो हाच ग्वाल्हेरचा रस्ता. हा रस्ता पूर्वी पायऱ्यांचा होता. आतां तो साधा पण खड्या उताराचा केला आहे. हा पूर्वी अनेक दरवाज्यांमधून जात असे, त्यांपैकीं कांहीं दरवाजे अद्याप राहिले आहेत. सर्वांत वरील दरवाजा हाथीपोर हा मान-मंदिरा लगत असून त्याचाच एक भाग आहे याचें शिल्प काम सुंदर आहे. याचे जवळ पूर्वी पाषाणमय हत्तीची मोठी मूर्ति होती त्यामुळें यास हाथीपोर हे नांव पडलें. ती आतां नष्ट झाली आहे. यांतून बाहेर गेल्यावर कांहीं अंतरावर डाव्या बाजूचे कड्यांत पोखरून केलेले दोन पाण्याचें हौद आहेत. पैकीं एकास अनार बावडी व एकास शरद् बावडी म्हणतात. याच्या जरा पुढे पहाडांत कोरलेल्या विष्णु, शिव, सूर्य, वगैरेच्या मूर्ति आहेत. त्या आतां जीर्ण किंवा भग्न स्थितींत आहेत. येथें रस्ता एक वळण घेऊन दुसऱ्या दरवाज्यातून बाहेर निघतो. या दरवाज्यास लक्ष्मण दरवाजा म्हणतात या बाहेर सुमारें ५० फुटावर खडकांत कोरलेलें चतुर्भुज विष्णूचें मंदिर उजव्या हातास रस्त्याच्या लगत आहे, तें वि. स. ९३२ त कनोजच्या रामदेव राजाचा अमल येथें असतांना अल्ल

नावाच्या किल्लेदारानें कोरविलें. अशा आशयाचा संस्कृत शिलालेख त्यावर आहे. इतर ही दोन दानपत्रें त्यावर कोरलीं आहेत.

येथून कांहीं यार्ड पुढें उतरल्यावर डाव्या हातास एक ग्वालिप साधूचें मंदिर, एक लहानशी मशीद त्याचे जवळच उंचावर कांहीं जैन लेणीं आहेत यापुढें उजव्या हातास जवळच किल्ल्याचे पायथ्याशीं सरदार्स स्कूलच्या विद्यार्थ्यांकरीतां ठेविलेल्या घोड्यांचा तबेला लागतो व त्याचे जवळच डाव्या हातास गुजरी महालांत जाण्यास बाहेरचे प्रवेशद्वार आहे. याच महालांत प्राचीन वस्तु संग्रहालय किंवा Archœological Museum हल्लीं ठेविलें आहे. त्याची दगडावर कोरलेली पाटी दरवाज्याचे बाजूवर व समोरही आहे.

हा गुजरी महाल तोमर राजा मानसिंह यानेंच आपली आवडती गूजर जातीची राणी 'मृगनयना' हिचे साठीं बांधला म्हणून हा मानमंदिराच्या समकालीन आहे. यावरही नक्षीकाम व रंगाचें काम मानमंदिराप्रमाणेंच आहे. या इमारतींत छज्जा व तुळया खालीं हत्तींच्या व मोरांच्या आकृतीचे सुन्दर ब्रॅकेट लाविले आहेत.

पुराणवस्तुसंग्रहालयांत ग्वाल्हेर संस्थानच्या निर-निराळ्या भागांतून एकत्र केलेल्या दगडांच्या मूर्ति,

नक्षी काम, शिलालेख ताम्रलेख, नाणी, मृत्तिकापात्रें कोरीव विटा, सील, लोहमय हत्यारें, चित्रें, फोटोग्राफ, वगैरे प्राचीन शिल्पकला व इतिहास यावर प्रकाश पाडणाऱ्या प्राचीन वस्तु वर्गीकरण करून व लेबलें लावून व्यवस्थित रितीनें मंडिल्या आहेत. या वस्तु इ. स. पूर्वी ३०० पासून इ. सं. १७०० पर्यंतच्या काळांतील आहेत हा संग्रह मोठा दर्शनीय आहे.

गुजरी महालांतून बाहेर पडल्यानंतर हिंडोला दरवाजा व अलमगीरी दरवाजा असे दोन दरवाजे ओलांडले म्हणजे प्रेक्षक किल्ल्याच्या बाहेर येतो हिंडोला दरवाजा गुजरी महालाचा समकालीन असावा, तेथें पूर्वी एक हिंडोला म्हणजे झोंपाळा होता त्यावरून त्याचें हें नांव पडलें आहे. याला बादलमहाल दरवाजा अशीही संज्ञा आहे; कारण याचे जवळच बादलमहाल या नावाची एक इमारत होती. ती आतां नष्ट झाली आहे हिंडोला व आलमगीर दरवाजाचें मध्यंतरीं एक चौक व त्यास लागून एक दोन दालनें आहेत त्यांस कचेरी असें अद्याप म्हणतात, मुसलमानी आमदनींत येथे किल्लेदारीची कचेरी असे व येथेंच फिर्यादींचा इंसाफ केला जात असे. आलमगीर दरवाजा हा किल्ल्याचा शेवटचा दरवाजा असून तो अलमगीरचे वेळीं बांधला. यासच ग्वाल्हेर असेंही म्हणतात.

येथें सध्यां पहारा असतो येथेंच बाहेर जातांना आपण विकत घेतलेला पास शिपायास परत द्यावा लागतो. ग्वाल्हेर गेटनें प्रवेश केल्यास वर दिलेल्या उलट अनुक्रमानें इमारती पहात जावें व उरवाही दरवाजानें पश्चिमेकडे बाहेर पडावें.

किल्ल्याचे बाहेर पण त्यास लागूनच जामा मसजिद आहे ती जहांगीर व शहाजहान यांचे वेळीं बांधलेली आहे.

मुहम्मद गोस या प्रसिद्ध मुसलमान फकीराचा मकबरा किल्ल्याचे पूर्वेस सुमारें अर्ध्या मैलावर आहे हा फकीर बाबर, हुमायून व अकबर यांचा समकालीन असून हे सर्व बादशाह त्यास मानीत असत हा मूळचा ग्वाल्हेर चा कांहीं दिवस दरबारांत राहून हा परत आपल्या मूळ ठिकाणीं राहावयास आला व येथेंच त्याचा अंत झाला. बादशाहकडून त्यास बरीच जाहागीर होती; त्याचे-वंशज अद्याप येथें राहतात हा मकबरा अकबरचे कार-किर्दीत बांधला गेला. यावर भव्य घुमट असून याच्या पूर्व व उत्तर बाजूस दगडी जाळ्यांचें जें नक्षीकाम केलें आहे तें प्रेक्षणीय असून त्यांत अनेक तऱ्हेचे जाळींचे सुंद नमूने पहावयास मिळतात, हें जाळीचें काम अद्याप ग्वाल्हेरच्या कारागिरीचा विशेष असून पुष्कळ बनिये लोक

अद्याप आपल्या घरांतून असलें काम करवितात. सराफा रस्त्यांतील बऱ्याच हवेल्यांत हें काम करविलें गेलें आहे. या मकबऱ्याचे आसपास एक मोठें कबरस्तान असून त्यांत बहुतेक या फकीराच्या नातेवाइकांच्या कबरा आहेत.

प्रसिद्ध गायनाचार्य तानसेन याची कबर येथेंच आहे. ही मुख्य मकबऱ्याच्या पश्चिमेस आहे. कबर साधी आहे येथें दरसाल उरुस होतो, त्याच्या व्यवस्थेसाठीं सरकारांतून नेमणूक आहे. त्यासमयीं बाहेरचे पुष्कळ गवई वगैरे कलावंत लोक येतात, येथें एक चिंचेचे झाड आहे त्याचीं पानें सेवन केल्यानें अवाज मधुर होतो अशा समजुतीनें पुष्कळ गवई व गाणारणी बाया तीं खातात तानसेन मूळचा हिंदू व ग्वाल्हेरचा राहणारा. प्रथम रेव्याच्या राजा रामचंद्र याचा आश्रित होता. त्याजपासून अकबरानें त्यास आपल्या दरबारीं बोलाविलें व तेथें नवरत्नांत त्याची गणना झाली, तो पुढें मुसलमान झाला व फकीर महमंद गोसचा चेला बनला. आयनी अकबरींत त्यास मिया तानसेन म्हटलें आहे.

## अर्वाचीन प्रेक्षणीय स्थळें.

१. पब्लिक पार्क सरकारी राजवाड्याभोंवतीं फूलबाग नांवाची विस्तीर्ण बाग आहे. त्याचा एक भाग तोडून देऊन कैलासवासी पुण्यश्लोक माधव महाराजांनी लोक-

रंजनार्थ हें पार्क तयार केलें. १९२२ सालीं प्रिंस आफ वेल्सचें हस्तें हें उघडण्यांत आलें. यांतच माधव महाराजांनीं आपल्या परमपूज्य मातोश्री जिजा महाराजांचा संगमरवरी पुतळा एका सुंदर छत्रींत बसविला आहे. या पार्कचें विशेष हें कीं येथें हिंदूंचें मंदिर, सिखांचा गुरुद्वारा, मुसलमानी मसजिद, थिआसाफिकल लॉज अशी वेगवेगळ्या धर्माचीं व पंथाचीं पूजामन्दिरें सरकारी आश्रयानें बांधलीं आहेत. येथें कांहीं पशुपक्ष्यांचा संग्रह असून दर रविवारीं व बुधवारीं बॅथें बॅंड वाजतो. गोपाळ मंदिर प्रेक्षणीय आहे या पार्कमध्यें स्टेट म्युझियम आहे.

२. जयविलास हा महाराजांचा रहाता महाल आहे. हा सध्यांच्या महाराजांच्या आजांनीं पहिल्या जयाजीराव महाराजांनीं बांधविला. यांतील प्रसिद्ध दरबार हॉल इतालियन पद्धतीचा भव्य व सुंदर आहे या इमारतींत प्रचंड दगडांच्या तुळ्यांचा उपयोग केला आहे यांचे दोन नमूने सध्यां पार्कमध्यें पाहाण्यासांठीं ठेविले आहेत. हे ग्वाल्हेरच्या आसपासच्या दगडांच्या खणीतील आहेत. हा महाल पाहण्यासाठीं प्रायव्हेट सेक्रेटरीच्या कचेरीतून परवानगी मिळवा लागते.

३. मोती महाल. हाही जयाजीरावानींच बांधविला. त्यांत कांहीं ठिकाणीं जडावाचें व चित्रांचें काम प्रेक्षणीय आहे येथें आतां सेक्रेटरीयटच्या कचेऱ्याची आहेत. यांतील

गोल कमरा व पोलिटिकल मेम्बर साहब, बसंतात त्या हॉल मधील रागरागिणींची चित्रें अवश्य पाहवीं.

४. एल्जिन क्लब. हा राजवाड्याच्या दक्षिणेस प्रशस्त मोकळ्या जागीं आहे. यांत आधुनिक सर्व विलायती खेळ खेळण्याची उत्तम व्यवस्था आहे. बडे आफिसर व धनिक लोक यांचे साठीं ही संस्था आहे.

५. याचे जवळच व्हिक्टोरिया कॉलेज आहे. याची दगडी इमारत सुंदर आहे ही लार्ड कर्झनच्या हस्तें उघडण्यात आली. येथें बी. ए. व बी. एस. सी. पर्यंत शिक्षण मिळतें. आज पर्यंत याचा अलाहबाद युनिव्हार्सिटीशीं संबंध होता पण ती युनिव्हार्सिटी आतां रेसिडेन्शल झाल्यानें हें कॉलेज आतां नवीन झालेल्या आग्रा युनिव्हर्सिटीखालीं आले आहे.

६. याचे दक्षिणेस कांहीं अंतरावर जयारोग्य हास्पिटल आहे. याची इमारत भव्य आहे. हें सर्व संस्थानांतलि मध्यवर्ति आरोग्य भवन आहे. यांतील चिकित्सापद्धति व शस्त्रक्रिया युरोपियन तऱ्हेची आहे. तथापि सरकारी आरोग्य खात्यानें संस्थानांत ठिकठिकाणीं देशी पद्धतीचीं आरोग्य भवनें लहान प्रमाणावर उघडलीं आहेत व त्याचा प्रस्तर करण्याचा उपक्रम सुरू आहे.

७. याचे वायव्येस थोड्याच अंतरावर स्टेट इंजीनियरिंग वर्क्स किंवा वर्कशाप आहे. येथें विपुल मशीनरी विजेच्या शक्तीनें चालणारी असून सुतार काम, लोहार काम, ढळाई, वगैरे सर्व प्रकारचें काम केलें जातें.

८. यास लागूनच सरकारी पाटरी वर्क्स आहेत. त्यांत चहाचे सेट, बरण्या, फ्लोअर टाइल्स, खेळणीं हास्पिटलचीं उपकरणें इत्यादि चिनी मातीच्या वस्तु सुबक तयार होतात.

९. कंपू कोठी येथून पश्चिमेस आहे. हें जयाजीराव महाराजांचे राहण्याचें ठिकाण असे. याचे आसपास लश्कर (कंपू) चीं ठाणीं आहेत. म्हणून यांस कंपू कोठी असें नांव पडलें. येथेंच सध्यांचें साहित्य संमेलन भरत आहे.

१०-१४. जयाजी चौक लष्कर शहराच्या मध्यंवर्ती आहे. येथें पूर्वी दाट वस्ती व अरुंद गल्ल्या होत्या. त्या काढून टाकून त्यांचे जागीं हा विस्तीर्ण व रमणीय चौक केला गेला. यांचे मध्यभागी उंच चबूतऱ्यावर जयाजीराव महाराजाचा पुतळा उभा केला आहे. त्यावर लहानशी छत्री केली आहे. हेंच ठिकाण लष्करातील व्यवहाराचें केंद्र आहे. याचे चोहों बाजूस दुकानें, विद्युच्छक्तीनें चालणारा सरकारी छापखाना, मार्केट, गोरखी, जनरल

पोस्ट ऑफिस, हायकोर्ट, बँक, टाउनहॉल किंवा थिएटर इत्यादि मोठमोठ्या इमारती व लोकव्यवहाराचीं मुख्य स्थानें आहेत. गोरखी हाच मूळ राजवाडा. राजघराण्याचें देवघर येथेंच असून सर्व धार्मिक कृत्यें अद्यापि येथेंच होतात पोस्ट ऑफिसचा दर्शनी भाग ग्रीक पद्धतीचा आहे. टाउन हॉलची इमारत ही सुन्दर असून माधव महाराजांचे बंधु बळवंतराव भैया साहब यांचे देखरेखीखालीं त्याचा नमुना व बांधकाम तयार झालें.

१५. येथून आणखी वायव्यदिशेकडे राजघराण्याच्या छत्र्या अथवा समाधि आहेत. दौलतराव, जनकोजी, जयाजीराव या महाराजांच्या छत्र्या येथें आहेत. राणोजी-रावांची छत्री माळव्यांत शुजालपुरी व महादजीची पुण्याजवळ वानवडीस, व माधव महाराजांची शिवपुरीस (तयार होत) आहे. लष्करच्या छत्र्यांपैकीं जयाजीरावांचे छत्रीचें काम चांगलें प्रेक्षणीय आहे. प्रत्येक छत्रींत शिवलिंगा बरोबरच त्या त्या महाराजांचे व त्यांच्या राण्यांचे पुतळे आहेत त्यांस रोज सर्व राजभोग करण्यांत येतात.

१६. या छत्र्या पाहून परत आलें म्हणजे जयाजी चौकांतून पूर्वेकडे जाणारा मुख्य रस्ता लागतो त्याचें नांव सराफा यांतच सराफ वगैरे धनिक बनिया लोकांची

घरें व दुकानें आहेत. कांहीं घरावर कोरीव नक्षीचें व जाळ्याचें दगडी काम पाहण्या योग्य आहे.

१७. यानंतर जिन्सी हें ठिकाण लागतें. येथे तीन रस्ते मिळतात या लगतच एक नवी भव्य इमारत आहे. ही टेक्निकल स्कूलसाठीं म्हणून बांधली पण अद्याप रिकामीच आहे. पोलिटेक्निक इन्स्टिटयूट सर मायकल साहेबांच्या कोठींजवळ आहे. तेथें मुख्यतः विणकाम, सूत रंगविणें, सुतार काम वगैरे हाताचीं कामें शिकाविलीं जातात जिन्सीच्या जवळच पावर हाउस आहे. तेथून शहरांत दिवे, पंखे, कारखाने यांना विजेचा प्रवाह पुरविला जातो.

१८. स्टेशनचे रस्त्यावर इंडस्ट्रियल शोरूम आहे. ग्वाल्हेर संस्थानात तयार होणाऱ्या बहुतेक पदार्थांचे, चामड्याचे पदार्थ, लॉकडी पदार्थ, चिनी मातीचे पदार्थ इत्यादिचे नमूनें विक्रीसाठीं तेथें ठेविले आहेत.

१९ स्टेशनवरून मुरारकडे उत्तरेच्या बाजूनें जाणाऱ्या रसत्यावर रेस आहे. येथें पूर्वी घोड्यांच्या रेसेज होत असत पण कौन्सिल ऑफ रीजन्सीनें त्या बंद करण्याचें पुण्य पदरीं घेतलें आहे. याचे जवळच शेतकी खात्याचे प्रयोग क्षेत्र आहे.

२०, जयाजीराव कॉटन मिल मुरार स्टेशन नजीक आहे. प्रसिद्ध धनिक व दानशूर व्यापारी बिरला ब्रदर्स

यांनीं ही मिल चालविली आहे. ग्वाल्हेरांत ही एकच गिरणी आहे. येथें नित्य व्यवहाराचें साधें कापड चांगलें तयार होतें. सुमारीं २,५०० मजूर कामावर आहेत.

२१. मुरार येथें चामड्याचा मोठा कारखाना सरकारनें चालविला आहे. त्यांत बूट, सूट केसेज, हॅंड बॅग्ज, घोड्यांचें सामान ( सॅडल), गाडीचें सामान वगैरे वस्तु चांगल्या तयार होतात, तंबू बनविण्याचाही कारखाना लहानशा प्रमाणावर येथें आहे.

२२. ग्वाल्हियरचा सेंट्रल जेल किल्ल्याचे पश्चिमेस आहे. त्यांत अनेक कारखाने आहेत. त्यांपैकीं सतरंज्यांचा कारखाना नांवाजण्यासारखा आहे. येथें कैद्यांची व्यवस्था उत्तम ठेवितात. त्यांना धार्मिक व नैतिक शिक्षण देण्याचीही व्यवस्था आहे.

ही सर्व स्थळें सोईस्कर रीतीनें कशीं पहावीं याची माहिती नकाशासह या सोबत जोडली आहे.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ३७८
स्थापना

# परिशिष्ट.

## ग्वाल्हेर येथील प्रेक्षणीय स्थलांची सूची.

गट (अ)—१. किल्ला, २ आर्केआलाजिकल म्यूझियम, ३ मुहम्मदगोसचा मकबरा व तानसेनची समाधि.

गट (आ)—४ इंडस्ट्रियल म्यूझियम, ५ स्टेट म्यूझियम, ६ पब्लिकपार्क, गोपाळमंदिर, थिआसाफिकल लॉज, जीजा महाराजांच्या पुतळा मार्कंडेय मंदिर वगैरे ७ जयविलास ८ एल्गिन क्लब ९ पावर हाउस १० विक्टोरिया कॉलेज, ११ जयारोग्य हॉस्पिटल, १२ स्टेट इंजिनियरिंग वर्क्स, १३ पॉटरी वर्क्स.

गट (इ)—१४ सराफा बाजार, १५ जयाजी चौक, पुतळा १६ आलीजाह दरबार प्रेस, १७ मार्केट, १८ गोरखी अथवा जुना राजवाडा १९ जनरल पोस्ट ऑफिस, २० टाउन हाल, २१ राजघराण्याच्या छत्र्या, २२ जेल,

२३ टेक्निकल स्कूल. किंवा पोलिटेक्निक इन्स्टिटयूट.

टग (ई)—२४ रेसकोर्स, २५ एग्रीकलचरल फार्म, २६ जयाजी कॉटन मिल, २७ मुरारचा बंध २८ लेदर फॅक्टरी.

संमेलनास येणाऱ्या पाहुण्यांस संमेलनाचे कामांतून दररोज थोडी थोडी म्हणजे २।३ तासच फुरसत मिळल हें लक्ष्यांत ठेऊन प्रेक्षणीय स्थळांचे चार गट केले आहेत. सोबतच्या ग्वाल्हेर शहराच्या नकाशांत हीं स्थळें दर्शविलीं आहेत. प्रत्येक वेळीं एकेक गट पहावा. एकेक गट पाहण्यांस टांग्यातून गेलें तर २ ते ३ तास लागतील.

शिवपुरी पहावयाची असल्यास ग्वाल्हेरहून परत जातांना पहावी. ग्वालियर लाइट रेल्वेनें ग्वाल्हेरहून शिवपुरीस जावें व शिवपुरी पाहून पुढें मोटर सर्विसनें झांशीस जाऊन तेथून जी. आय. पी. ची ट्रेन घ्यावी.

# List of References for the Map.

1. Fort.
2. Archæological Museum.
3. Tombs of Muhammad Ghaus and Tansen.
4. Industrial Museum.
5. Public Park.
6. State Museum.
7. Motimahal with G L. R. Station.
8. Jaivilas Palace.
9. Elgin Club with G. L. R. Station.
10. Victoria College.
11. J. A. Hospital.
12. Engineering works and G. L. R. St.
13. Pottery works.
14. Saraffa Bazar.
15. Jayaji Chowk.
16. Town Hall.
17. A. D. Press.

18. Market.

19. Gorkhi or Sarkar Wada.

20. General Post Office.

21. Chhatri or cenetoph of Scindia family.

22. Central Jail.

23. Technical School.

24. Morar Station.

25. Gola-ka-mandir Station.

26. Kampoo Kothi ,,


27. Jiwajigang ,,

28. Gwalior Fort ,,

29. Jayaji Rao Cotton Mills Station.

REFBK-0003794

REFBK-0003794



ALIJAH DARBAR PRESS, GWALIOR.